# रेल्वे स्टेशनवर बनावट पोलीस!

## दोन वर्षांपासून परप्रांतीय प्रवाशांची लूट : टोळीचा पर्दाफाश



प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १६ -** पुणे रेल्वे स्टेशन येथे पोलिसांची वर्दी परिधान करुन परप्रांतीय प्रवाशांना लुटणाऱ्या टोळीचा पर्दाफाश झाला आहे. यातील एका मुख्य आरोपीस लोहमार्ग पोलिसांनी अटक केली. त्याच्या पाच साथिदारांचा शोध सुरू आहे. स्थानकावरील पोलिसांचा बंदोबस्त कमी होताच, ही टोळी पोलिसांचा वेशात दाखल होत होती. दरम्यान, वाढत्या तक्रारींची दखल घेत लोहमार्ग पोलीस अधीक्षक सदानंद वायसे यांच्या मार्गदर्शनाखाली ही बनावट पोलिसांची टोळी शोधण्यात यश आले.

### तब्बल ७२ सीसीटीव्हींद्वारे तपासणी

'रेल्वे स्थानकावरील सर्व फलाटांवर एकूण ७२ सीसीटीव्ही लावण्यात आले आहेत. हे सर्व सीसीटीव्ही तपासण्यासाठी लोहमार्ग पोलिसांनी सात पथके तयार केली. यामध्ये पोलिसांच्या वर्दीत दोन संशयीत हालचाल करणाऱ्या व्यक्ती दिसल्या. आम्ही ते आमचे पोलीस कर्मचारी आहेत का? याची तपासणी केली. मात्र, पोलीस कर्मचाऱ्यांपैकी हे दोघेही नव्हते. यामुळे लुबाडणुकीच्या प्रकाराशी पोलिसांचा संबंध नसल्याचे स्पष्ट झाले,' असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### पोलीस अधीक्षक म्हणतात..

यासंदर्भात माहिती देताना पोलीस अधीक्षक वायसे म्हणाले, हे पोलीस कर्मचारी नसल्याचे स्पष्ट झाल्यावर आम्ही त्यांना पकडण्यासाठी सापळा रचला. फलाटावर आम्ही आमचे पोलीस कर्मचारी साध्या वेशामध्ये ठेवले. दोन आठवड्यांपूर्वी जीआरपीने पोलीस कॉन्स्टेबलच्या गणवेशातील मुख्य आरोपीस ताब्यात घेतले. त्याने ज्या टेलरकडून कपडे शिवले होते, त्या टेलरच्या दुकानाचीही माहिती मिळाली आहे. त्याच्याकडे केलेल्या तपासात त्याने १७ परप्रांतीय प्रवाशांना पोलीस असल्याची बतावणी करत लुटल्याची कबुली दिली.

### प्रवाशांच्याही तक्रारी

परप्रांतीय कामगारांचे साहित्य तपासणी करण्याचा बहाणा करत 'तुम्ही गांजा लपवून ठेवला आहे, तो ताब्यात द्या' असे म्हणत त्यांच्याकडील रोकड लुटली जात होती. काही प्रवाशांना गाडीचे तिकीट व बसायला जागा मिळवून देतो, असे सांगत त्यांच्याकडून पैसे उकळले जात होते. यासंदर्भात परप्रांतीय प्रवाशांकडूनही पोलिसांचा त्रास होत असल्याच्या तक्रारी येत होत्या.

### रेल्वे प्रशासनाची पोलिसांकडे धाव

यंदा लॉकडाऊन सुरू होताच, मागील काही दिवसांत पुणे, पिंपरी-चिंचवड शहरात राहणारे परप्रांतीय कामगार त्यांच्या मूळ गावी परतण्यासाठी रेल्वे स्थानक गाठत होते. नेमका याच गोष्टीचा फायदा उठवत, ही बनावट पोलिसांची टोळी कार्यरत झाली. या टोळीने रेल्वे स्थानकावर लुटालुट सुरू केल्यावर 'पोलीस प्रवाशांची रोकड लुटत आहेत,' अशा तक्रारी मध्य रेल्वे प्रशासनाने लोहमार्ग पोलिसांकडे केल्या होत्या. त्यांनी संबंधित पोलीस कर्मचाऱ्यांचा शोध घेण्याची मागणी केली जीआरपीकडे केली होती. त्यानुसार तपास केला असता, या बोगस पोलिसांचे कारनामे समोर आले आहेत, असे सांगण्यात आले.

### अशी करायचे लूट

पुणे रेल्वे स्थानकाच्या राजा बहादुर मिलच्या बाजूच्या प्रवेशद्वाराकडून आरोपी रेल्वे स्थानकात दाखल होत होता. आरोपी दुष्काळग्रस्त भागातील असून तो चार वर्षांपूर्वी पुण्यात आला होता. त्याचे सर्व साथीदार मराठवाड्यातील असून ते पळून गेले आहेत. या आरोपींनी अशाच प्रकारे मागील दोन वर्षांत अनेकांना लुबाडले आहे. यामुळे तपास न लागलेल्या केसेसंदर्भात नव्याने तपास करण्यात येईल. सध्या पोलिसांनी आरोपी व त्याच्या पाच सहकाऱ्यांवर दोन गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.